दिनांक १६/११/२०२१

# प्रेस नोट

**आरोपी लोकसेवक मुख्यध्यापक विठ्ठल व्यंकटराव मुचवाड, वय ४७ वर्षे, पद– मुख्याध्यापक, वर्ग–३, नेमणुक– शारदा सदन अनुसूचित जाती प्राथमीक आश्रम शाळा, आर्वी, लातुर, जि. लातुर यांनी लाचेची मागणी करून लाच लाचेची रक्कम स्वत: स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यांना मिळालेल्या सातव्या वेतन आयोगाच्या एकुण प्राप्त ऐरियस बिलाच्या १९ टक्के प्रमाणे कामाचा मोबदला म्हणुन तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रार दिनांक १२/११/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातुर या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दिनांक १६/११/२०२१ रोजी ११.०५ वा चे सुमारास पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक मुख्यध्यापक विठ्ठल व्यंकटराव मुचवाड यांनी तक्रारदार यांच्या सातव्या वेतन आयोगाचे ऐरियस बिल त्याच्या बॅंक खात्यावर जमा केले म्हणुन एकुण बिलाच्या १९ टक्के रक्कम कामाचा मोबदला म्हणुन दयावा लागतो, असे म्हणुन १९,१५७/– रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

आरोपी लोकसेवक मुख्यध्यापक विठ्ठल व्यंकटराव मुचवाड यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देण्यासाठी तक्रारदार यांना दिनांका १६/११/२०२१ रोजी शारदा सदन अनुसूचित जाती प्राथमीक आश्रम शाळा, आर्वी, लातुर येथील मुख्याध्यापक यांचे कार्यालय येथे पाठविले असता आरोपी लोकसेवक मुख्यध्यापक विठ्ठल व्यंकटराव मुचकाड यांनी लाचेची रक्कम १९,१५७/– रूपये १४.१८ वाजता आश्रम शाळेतील मुख्याध्यापक यांचे कार्यालयात पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन त्याना रंगेहात पकडण्यात आले आहे.

तक्रारदार यांनी आरोपी लोकसेवक यांचे विरुध्द पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी लातुर येथे कलम ७ ला.प्र. का. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हाचा तपास पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक पंडीत रेजितवाड, सपोउपनि संजय पस्तापुरे, पोह/रमाकांत चाटे, भागवत कठारे, पोना/संतोष गिरी, मपोना/शिवकांता शेळके, पोका/शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, संदीप जाधव, दिपक कलवले, मपोशि रुपाली भोसले, पोका/गजानन जाधव, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा.श्रीमती कल्पना बारवकर,<br>पोलीस अधीक्षक,ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र | :– | मो.क्रं. ८८८८८४१९६५ |
| २) | पंडीत रेजितवाड, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि. लातुर | :– | मो.क्र ९३०९३४८१८४ |
| ३) | टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक | :– | १०६४ |
| ४) | कार्यालयाचा फोन क्रमांक | :– | ०२४८२–२४२६७४ |
| ५) | Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ६) | Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| ७) | Facebook Page | :– | www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

Scanned with CamScanner